**"जुलै २०१६" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(अ) शासन निर्णय / अधिसूचना**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विविध पर्यायांची तपासणी करण्यासाठी दिनांक ७ जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे.

- सामान्य प्रशासन विभाग (सेवा) अंतर्गत Human Resource Management System हा ई-प्रशासन प्रकल्प कार्यान्वित करुन त्याची अंमलबजावणी करण्याकरिता दिनांक ८ जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC - Project Implementation Committee) गठित करण्यात आली आहे.

- कामाच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी दिनांक २५ जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये विभागीय महिला समिती गठित करण्यात आली आहे.

- "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (सुधारणा) नियम २०१६" हे नियम दिनांक १६ जुलै २०१६ च्या अधिसूचनेन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

- यशदा, पुणे यांच्यामार्फत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचे वेतन अदा करणे व त्याची संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रतिपूर्ती करुन घेण्यासाठी दिनांक १८ जुलै २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**(ब) पदोन्नती / निवडसूची**

- मंत्रालयीन संवर्गातील ७ उच्चश्रेणी लघुलेखकांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर, २२ निम्नश्रेणी लघुलेखकांना उच्चश्रेणी लघुलेखक पदावर व ६ लघुटंकलेखकांना निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.

- मंत्रालयीन संवर्गातील ८८ सहायक कक्ष अधिकारी (गट-ब अराजपत्रित) यांना कक्ष अधिकारी (गट-ब राजपत्रित) पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. १ अवर सचिव यांना उपसचिव पदी पदोन्नती देण्यात आली आहे. १ कक्ष अधिकाऱ्याला अवर सचिव पदावर प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

- मंत्रालयीन संवर्गातील वरिष्ठ स्वीय सहायक, निवडश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ रोजीची स्थिती दर्शविणाऱ्या अंतिम ज्येष्ठतासूच्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

- दिनांक २२ जुलै २०१६ च्या शासन आदेशान्वये सन २००२-०३ ते २००९-१० या कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या निवडसूच्यांमध्ये खुल्या ठेवलेल्या प्रकरणांपैकी संबंधित ८ अवर सचिवांना निवडसूची वर्षनिहाय नियमित / ज्येष्ठतेचे दिनांक देण्यात आले आहेत.

(क) बदल्या / पदस्थापना

- उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे ७, ७, १ अशा १५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

- सहसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे १, २, ५ अशा ८ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आल्या आहेत.

- सहायक कक्ष अधिकारी, निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गातील अनुक्रमे २, ३ अशा ५ कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आल्या.

- भारतीय प्रशासन सेवेतील ७ अधिकाऱ्यांच्या दिनांक ११ जुलै २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या करण्यात आल्या आहेत.

- "उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) परीक्षा २०१५" मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत प्रतिक्षायादीतील ४ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले. "निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) परीक्षा २०१५" मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगपुरस्कृत प्रतिक्षायादीतील ३ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले.

***********